# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः26.08.2024** **वारःसोमवार**

---

1. महिला सुरक्षेला देशाचं सर्वोच्च प्राधान्य, महिलांवर अत्याचार करणाऱ्यांची गय केली जाऊ नये-पंतप्रधानांची स्पष्टोक्ती,
2. सर्वांना न्याय मिळवून देण्यासाठी न्यायव्यवस्थेत तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचा वापर करण्याचं पंतप्रधानांचं आवाहन,
3. अंमली पदार्थांच्या बेकायदेशीर व्यापाराचं जाळं कठोरपणे उखडून टाकण्याची गरज गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून व्यक्त, आणि
4. सरकारी कर्मचाऱ्यांना सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा महाराष्ट्र मंत्रिमंडळाचा निर्णय.

**<u>पंतप्रधान-जळगाव</u>**

महिला सक्षमीकरणासोबतच त्यांची सुरक्षेला देशाचं सर्वोच्च प्राधान्य असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. महिलांवरील अत्याचार हे अक्षम्य पाप असून दोषींना सोडले जाऊ नये, असेही ते म्हणाले. महाराष्ट्रातील जळगाव इथं आयोजित एका कार्यक्रमात 11 लाख नवीन लखपती दीदीना प्रमाणपत्रांचं वाटप केल्यानंतर मोदी बोलत होते. रुग्णालयं, शाळा, कार्यालयं किंवा पोलीस यंत्रणा यासारख्या सार्वजनिक संस्थांना जबाबदार धरले पाहिजे आणि त्यांच्याकडून कोणताही निष्काळजीपणा अस्वीकारार्ह असल्याचं मोदीं यांनी नमूद केलं. महिलांच्या जीवनाचं आणि सन्मानाचं रक्षण करणं ही समाज आणि सरकार म्हणून आपली सर्वात मोठी जबाबदारी असायला हवी, असंही पंतप्रधान म्हणाले. पंतप्रधानांनी लखपती दीदींचा सत्कार केला आणि त्यांच्याशी त्यांच्या व्यवसायाबाबत चर्चा केली. सरकार महिलांसाठी आत्तापर्यंत त्यांच्यासाठी मर्यादा असलेली सर्व क्षेत्रं खुली करण्याचा प्रयत्न करत असल्याचंही पंतप्रधानांनी अधोरेखित केलं.

राज्यात महिलांच्या सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह विविध योजना राबवण्यात येत असून, या माध्यमातून महिलांना आत्मनिर्भर बनवण्याचं काम राज्य शासन करत आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. देशाच्या 3 कोटी लखपती दीदी बनवण्याच्या प्रक्रियेत महाराष्ट्राचा वाटा मोठा असून, राज्यातील 50 लाख दीदींचा समावेश असेल, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. लखपती दीदी ही महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारी आणि विकासाला वेग देणारी असून त्यांना स्वावलंबी करण्याचा हा प्रयत्न असल्याच शिवराजसिंह चौहान यांनी यावेळी सांगितलं. महाराष्ट्रात 11 लाख लखपती दीदी झाल्या आहे. त्यांनी इतरांना प्रेरित करावे, असं आवाहन त्यांनी केलं.

राज्यात बचत गटांमार्फत 75 लाख कुटूंब जोडली गेली असून, दोन कोटी कुटूंब जोडण्याचा संकल्प आपण केला आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील वंदना पाटील, मनीषा जगताप, ज्योती तागडे, सीमा कांबळे, रमा ठाकूर यांच्यासह विविध राज्यातील निवडक महिला प्रतिनिधींना मोदी यांच्या

हस्ते लखपती दीदी झाल्याबद्दल सन्मानपत्र देण्यात आलं; तसंच बचत गटाच्या 48 लाख महिलांना 2 हजार 500 कोटी रुपयांच्या फिरत्या निधीचं वितरण करण्यात आलं.

**<u>पंतप्रधान-राजस्थान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वांना न्याय मिळवून देण्यासाठी न्यायिक व्यवस्थेत तंत्रज्ञान आणि नवीन नवकल्पनांचा वापर करण्याचं आवाहन केलं आहे. जरी सध्याच्या प्रक्रियेमुळे हे उद्दिष्ट गुंतागुंतीचे होत असले तरी न्यायवितरण सुलभ करणे ही सामूहिक जबाबदारी आहे, यावर त्यांनी भर दिला. जोधपूरमध्ये राजस्थान उच्च न्यायालयाच्या षष्ट्यब्दी सोहळ्याच्या समारोप समारंभात ते बोलत होते. कालबाह्य कायदे रद्द करण्यासह, अधिक सरळ न्याय वितरणाच्या दिशेने देशानं केलेल्या ऐतिहासिक प्रगतीवर पंतप्रधानांनी प्रकाश टाकला. हे बदल देशाच्या वाढत्या महत्त्वाकांक्षा आणि नवीन भारताच्या दृष्टीला समर्थन देण्यासाठी आधुनिक प्रणालींच्या गरजेशी सुसंगत असल्याचं लक्षात घेऊन त्यांनी फौजदारी कायद्यातील अलीकडील सुधारणांची आवश्यक म्हणून प्रशंसा केली. त्यांनी नमूद केले की देशभरातील 18, हजारांहून अधिक न्यायालयं संगणकीकृत करण्यात आली आहेत, त्याचा जनतेला लक्षणीय फायदा होत आहे. कार्यक्रमादरम्यान, पंतप्रधानांनी राजस्थान उच्च न्यायालयाच्या संग्रहालयाचे उद्घाटन केलं आणि 'त्वरित' कार्यक्रमाचा शुभारंभ केला.

**<u>मन की बात</u>**

अंतरिक्ष क्षेत्रातील सुधारणांमुळे देशातील युवा वर्गाला मोठा फायदा झाल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते काल आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमात बोलत होते. नुकत्याच साजऱ्या झालेल्या पहिल्या राष्ट्रीय अंतरिक्ष दिनानिमित्त अंतरिक्ष तंत्रज्ञान क्षेत्रातल्या युवकांशी त्यांनी संवाद साधला. या कार्यक्रमाचा हा एकशे तेरावा भाग होता. कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या युवक-युवतींनी राजकारणात यावं, असं आवाहन आपण स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलं होतं, त्याला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. आज मोठ्या संख्येनं युवा राजकारणात यायला तयार आहेत, त्यांना योग्य मार्गदर्शन आणि योग्य संधी देण्याची गरज आहे, असं पंतप्रधान म्हणाले.

युवकांचं हे पाऊल देशाचं भविष्य बदलवून टाकणारं ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी, अनेकांनी स्वातंत्र्य लढ्यात स्वतःला झोकून दिलं, विकसित भारताचं लक्ष्य साध्य करण्यासाठी आज अशाच समर्पण भावनेची गरज असल्याचं, पंतप्रधान म्हणाले. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर राबवल्या गेलेल्या 'हर घर तिरंगा' अभियानाला यंदाही मोठा प्रतिसाद मिळाल्याचं त्यांनी सांगितलं. येत्या काही दिवसात साजऱ्या होणाऱ्या सण-उत्सवांसाठी त्यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या. चांद्रयान-3 मोहिमेच्या यशाचे प्रतीक म्हणून त्यांनी या महिन्याच्या 23 तारखेला राष्ट्रीय अंतराळ दिन साजरा करण्याचे महत्त्व सांगितले.

कार्यक्रमादरम्यान, पंतप्रधान मोदींनी IIT-मद्रासच्या माजी विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या Spacetech Start-up GalaxEye च्या टीमशी संवाद साधला. पंतप्रधान म्हणाले की, अंतराळ परिसंस्था दोलायमान होत आहे. आपल्या या ताज्या संवादामध्ये पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून केलेल्या या वर्षीच्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणावर लक्ष केंद्रित केलं आणि बिगरराजकीय पार्श्वभूमीच्या किंवा राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या एक लाख तरुणांना राजकीय व्यवस्थेशी जोडण्याचं आवाहन केलं होतं. या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद मिळाला असून मोठ्या संख्येनं तरुण राजकारणात येण्यासाठी उत्सुक आहेत. बिगरराजकीय पार्श्वभूमीतील तरुणांचा राजकारणात प्रवेश देशाच्या भविष्यासाठी परिवर्तनकारी ठरेल, असं प्रतिपादन त्यांनी केलं.

**शहा-अमली पदार्थ**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते काल छत्तीसगडमधील नवा रायपूर इथं अंमली पदार्थ नियंत्रण कार्यालयाच्या प्रादेशिक कार्यालयाचं दूरदृश्य प्राणलीच्या माध्यमातून उद्धाटन करण्यात आलं. यावेळी केंद्रीय गृहमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली छत्तीसगडमधील अंमली पदार्थांच्या परिस्थितीबाबत आढावा बैठकही झाली. भारताच्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षात अर्थात 2047 पर्यंत देश अंमली पदार्थमुक्त करण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संकल्प आता प्रत्येक देशवासीयाचा संकल्प बनत आहे. अंमली पदार्थांचा अवैध व्यापार राष्ट्रीय सुरक्षेशी निगडीत आहे, असं शहा यावेळी म्हणाले. अंमली पदार्थांच्या तस्करीतून मिळणारा पैसा दहशतवाद आणि डाव्या विचारसरणीला प्रोत्साहन देतो आणि देशाची अर्थव्यवस्था कमकुवत करतो. बेकायदेशीर व्यापाराचं जाळं कठोरपणे उखडून टाकण्याची गरज आहे. याविरोधात सरकार शून्य सहनशीलतेचे धोरण घेऊन पुढे जाईल, असंही ते म्हणाले.

**महा-कॅबिनेट**

केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर राज्य सरकारी सेवेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी सुधारित राष्ट्रीय पेन्शन योजना लागू करण्यास महाराष्ट्र सरकारनं काल मान्यता दिली. मार्च 2024 पासून त्याची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आली आहे. केंद्राच्या धर्तीवर राज्य सरकारी सेवा कर्मचारी सुधारित राष्ट्रीय सेवानिवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी गृहीत धरण्यात आले असून त्याचा लाभ लाखों कर्मचाऱ्यांना मिळणे अपेक्षित आहे. या योजनेची व्याप्ती वाढवण्यासही मंत्रिमंडळानं मान्यता दिली असून दिवसा शेतकऱ्यांना अखंडित वीज पुरविण्याची योजना त्यामधून कार्यान्वित करण्यात येणार आहे.

**गोयल सिंगापूर**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल सध्या सिंगापूर दौऱ्यावर आहेत. त्यांनी काल सिंगापूरमध्ये विविध जागतिक व्यावसायिक नेत्यांशी द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणुकीच्या मुद्द्यांवर चर्चा केली. याबाबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या एका निवेदनात, वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं म्हटलं आहे की, भारतातील गुंतवणुकीच्या संधी शोधणं, देशाच्या आर्थिक विकासाचा लाभ मिळवत विविध क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवणं या मुद्यावर या बैठकीत लक्ष केंद्रित करण्यात आलं असून या चर्चांमध्ये सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगक्षेत्रासह गुंतवणूक वाढवण्यावर भर देण्यात आला. अत्याधुनिक शिक्षण वातावरण विकसित करण्यासाठी भारत आणि सिंगापूर यांच्यातील सहकार्याच्या संधी शोधण्यासाठी केंद्रीय मंत्र्यांनी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्निकल एज्युकेशन-ITE मुख्यालय आणि सिंगापूरमधील ITE कॉलेज सेंट्रललाही भेट दिली.

**टेनिस**

न्यूयॉर्कमध्ये आजपासून सुरू होणाऱ्या अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत, भारताचं नेतृत्व सुमित नागल आणि रोहन बोपण्णा करणार असल्यानं, भारतीयांच्या नजरा त्यांच्या कामगिरीकडे लागल्या आहेत. 2019 नंतर सुमित नागल या वर्षी चारही ग्रॅडस्लॅम स्पर्धांमध्ये भारताचं प्रतिनिधित्व करणारा पहिलाच खेळाडू आहे. तर दोन वेळा ग्रॅण्डस्लॅम विजेता असलेला रोहन बोपण्णाला त्याचा ऑस्ट्रेलियन जोडीदार मॅथ्यू एबडेन यांना दुसरे मानांकन देण्यात आलं आहे.

**आशियाई सर्फिंग**

मालदिव इथं सुरू असलेल्या आशिया सर्फिंग अजिंक्यपद स्पर्धेतल्या मारुहाबा चषक स्पर्धेत काल भारतानं रौप्य पदकाला गवसणी घातली. कमाली पी, अजीश अली, श्रीकांत डी आणि संजय सेल्वामणी यांचा समावेश असलेल्या विजेत्या भारतीय संघानं पहिल्यांदाच सर्फिंग खेळासाठी या स्पर्धेत स्थान मिळवले. 2026 मध्ये जपान इथं होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत महिला आणि पुरूष दोन्ही संघ सहभागी होणार आहेत.

**<u>नांदेड खासदार निधन</u>**

नुकत्याच हाती आलेल्या बातमीनुसार महाराष्ट्रातल्या नांदेडचे खासदार वसंत चव्हाण यांचं आज पहाटे हैदराबादच्या किम्स रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झालं. ते 70 वर्षांचे होते. यावर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी भाजपचे प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा पराभव केला होता. चव्हाण यांना 13 ऑगस्टला प्रकृती बिघाडामुळं हैदराबादला हलवण्यात आलं होतं. त्याच्यावर डायलिसिसचे उपचार सुरू होते. उद्या त्यांच्यावर नायगाव इथं अत्यंसंस्कार होतील अशी माहिती त्यांच्या कुटुंबियांनी दिली आहे.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्राचा घाट प्रदेश आणि विदर्भात वीजांसह अतिवृष्टीचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.